The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109

A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal

Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संत एकनाथ महाराज यांच्या निवडक भारुडातील नाट्यमयता

**डॉ. तुकाराम हरिश्चंद्र देवकर**

**नाट्यशास्त्र विभाग** श्री पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालय सिरसाळा ता. परळी जि. बीड

**प्रस्तावना**

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत गोरोबा कुंभार, संत चोखोबा, संत जनाबाई असे अनेक संत या भूमीत होऊन गेले. या संतांनी आपल्या साहित्यातून मोठ्या प्रमाणात तत्कालीन समाजाला उपदेश केलेला आहे. अभंग, ओव्या, गवळणी आणि आपल्या काव्यातून या संतांनी विश्वशांतीचा संदेश देत, त्या परम परमात्म्याशी एकरूप होण्याचा मंत्र सांगितलेला आहे. परंतु आध्यात्मिक उपदेशापेक्षा लोकभाषेतून केलेला नाट्यरूपातला उपदेश समाज मनावर अधिक परिणाम करतो, हे संतांच्या लक्षात आले. त्यातूनच 'भारुड' या नाट्यरूपातील कला प्रकाराचा उदय झाला असावा. महाराष्ट्राच्या लोकपरंपरेत 'भारुड' या कलाप्रकाराला अनन्यसाधारण महत्त्व आहे. तसे तर महाराष्ट्राच्या लोकरंगभूमीवर जागरण, गोंधळ, लळीत, पंचमी, भावडा, भराड इत्यादी विधीनाट्याचे प्रकार पाहायला मिळतात. या सर्व लोककला प्रकारात आपल्याला नाट्य पाहायला मिळत असले तरी, भारुड या कला प्रकारातील नाट्यमयता अधिक प्रकर्षाने जाणवते. भारुडातील नाट्य, संवाद, वाद्ये, नेपथ्य, वेशभूषा, आणि रंगभूषा ही सर्वसामान्यांना सहज समजेल अशी असल्यामुळे त्यात मोठ्या प्रमाणात नाट्यमयता दिसून येते. भारुड या काव्य प्रकारातील नाट्यमयतेचा इथे आपण थोडक्यात आढावा घेऊया.

**भारुड म्हणजे काय ?**

डॉ. प्रभाकर मांडे आपल्या लोकरंगभूमी ग्रंथात असे लिहितात की, ' भारुड या शब्दाचा अर्थ लांबच लांब, गुंतागुंतीची, कंटाळवाणी वृत्तांत कथा, अवघड कूट कविता, लेख, रूपक इत्यादी.' म्हणजेच भारुड हा एक काव्याचाच प्रकार असून त्याचे निरूपण केले जाते. त्यातुन नाट्यमयता दिसून येते. 'बहुरूढ' या मूळ शब्दावरून पुढे 'भारुड' हा शब्द बनला, असेही काही अभ्यासकांचे मत आहे. म्हणजे ज्यातून एकापेक्षा जास्त अर्थ निघतात, असे काव्य म्हणजे 'भारुड' होय, असेही म्हणता येईल. ' नैतिक व अध्यात्मिक शिकवण देणारे मराठीतील रूपकात्मक नाट्यगीत म्हणजे भारुड होय.' ही व्याख्या जास्तीत जास्त समर्पक वाटते. पुर्वी संतांनी सरळ सरळ उपदेश न करता आडवळणाने समाजाला उपदेश करण्यासाठी भारुड काव्ये रचली आहेत.

**नाथ महाराजांच्या भारुडातील नाट्यमयता**

आपल्याकडे जवळजवळ एक हजार वर्षापासून भारुडाची परंपरा आहे. भारुड हा लोकभाषेतील काव्यप्रकार असल्याने तो सामान्य लोकांनाही सहज समजतो. ज्ञानेश्वर महाराजांपासून ते तुकाराम महाराजांपर्यंत अनेक संतांनी भारुड काव्याची रचना केलेली दिसते. मात्र 'भारुड' म्हटले की संत एकनाथ महाराजांचेच नाव समोर येते. याचे कारण म्हणजे नाथ महाराजांनी सामान्य जनतेच्या जीवनाशी समरस होणारे विषय लोकभाषेतून आपल्या भारुडात मांडलेले आहेत. जवळजवळ १५०

विषयांवर ३५० पेक्षा ही जास्त भारुडे नाथ महाराजांनी रचल्याचे दिसते. भारुड हे दोन प्रकारचे असतात. **१) भजनी भारुड २) सोंगी भारुड, आणि ३) कुट भारुड** नावाचा आणखी एक तिसरा प्रकारही यात असतो. 'भजनी भारुडात केवळ नाद स्वरांच्या माध्यमातून भारुडातील रूपके गायली जातात. त्यांचे स्पष्टीकरण करण्याचाही त्यात प्रयत्न नसतो. अशा भारुडांना भजनी भारुड असे म्हणतात.' आणि दुसरा प्रकार म्हणजे सोंगी भारुड भजनामध्ये जशी भारुडे गायली जातात त्याचप्रमाणे लळीतात भारुडे नाट्य स्वरूपात सादर केली जातात. इथे भारुडांचे केवळ गायन नसते, तर त्याशिवाय नृत्य, नाट्य, आणि संगीत या अविष्कार माध्यमांची जोड देऊन लळीताच्या रंगभूमीवर सादर केली जातात. ज्यांच्या वरील रूपक असेल त्याचे सोंग वठविले जाते.' या दोन्ही प्रकारच्या भारुडाचा उद्देश हाच की, आध्यात्मिक ज्ञानासोबत जीवनावश्यक ज्ञान माणसाला मिळावे. त्यासाठी सरळ उपदेश न करता लोकांचे मनोरंजन करत, आध्यात्माला लोकजीवनाची जोड देत उपदेश करणे, प्रथम रूपकाच्या काव्यातील वैशिष्ट्याने लक्ष वेधून घ्यायचे, त्या रूपकाच्या आशयाचा उलगडा करण्यात लोकांना गुंतवायचे, आणि शेवटी आध्यात्मिक-नैतिक आशय त्यांच्या मनात उतरवायचा, अशी किमया भारुड या रूपकातून साधली जाते. सोंगी भारुडा ती प्रखरपणे जाणवते. म्हणूनच नाथ महाराजांच्या भारुडातील नाट्यमयता इथे तपासून पाहू या नाथ महाराजांच्या भारुडात आपल्याला विविधता पाहायला मिळतेच, त्यासोबतच त्यातून नाट्यमयता देखील दिसते, त्यात हास्य विनोद असतात. आणि त्यासोबतच त्यात गेयता असते. या चार वैशिष्ट्यांमुळे नाथांची भारुडे लोकप्रिय झाल्याचे दिसते.

नाथ महाराजांचे एक भारुड पहा......

**'सत्वर पाव ग मला, भवानी आई रोडगा वाहीन तुला || धृ ||**
**सासरा माझा गावी गेला, तिकडेच खपवी त्याला, भवानी आई..||**
**सासू माझी जाच करीते, लवकर नेई गं तिला, भवानी आई ||**
**जाऊ माझी फडाफडा बोलते, बोडकी कर ग तिला, भवानी आई ||**
**नणंदेचं कार्ट किरकिर करत, खरूज येऊ दे त्याला, भवानी आई ||**
**दादला मारून आहुती देईन, मोकळी कर ग मला, भवानी आई ||**
**एका जनार्दनी सगळेच जाऊ दे, एकटीच राहू दे मला, भवानी आई रोडगा वाहीन तुला ||'**

नाथ महाराजांचे हे भारुड बघा नाथांनी या भारुडा दैनंदिन संसाराच्या नातेसंबंधांना स्पर्श करत आध्यात्मिक आशयाशी सांगड घातलेली दिसते. जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून मुक्ती मिळविण्यासाठी एकट्यालाच वाटचाल करावी लागते. काम, क्रोध, मोह, लोभ, मद, मत्सर हे विकार प्रत्येक माणसात असतात. या षड्रिपू वर विजय मिळविण्यासाठी अध्यात्माच्या मार्गाने जावे लागते. अहंकार हा प्रत्येक माणसात असतो. द्वेष, अविवेकीपणा यामुळे माणूस संसारात गुंतून पडतो त्यातून मुक्त होऊन शाश्वत आनंद मिळविण्यासाठी देवीची प्रार्थना या भारुडामध्ये केलेली आहे. इथे सगेसोयऱ्यांची साथ उपयोगाची नाही, असा मतितार्थ नाथ महाराजांच्या या भारुडातून पाहायला मिळतो. या भारुडातील नाट्यमयता बघा.. एका स्त्रीसाठी सासरचे (नाशवंत दुनियेतले ) सर्व सगेसोयरे अडचणीचे वाटतात. ती नेहमी त्यांच्यापासून लांब राहण्याचा प्रयत्न करते. कारण तिला आपला संसार सुखाने करायची इच्छा

आहे. असे हे भारुड जेव्हा रंगमंचावर सादर होते, तेव्हा त्या स्त्रीचे घेतलेले सोंग, स्त्रियांच्या अदा, तिचे नखरे, तिची वेशभूषा, आणि त्यातील नेपथ्य या गोष्टी नाट्य निर्माण करणारे आहेत. मंचावर जेव्हा ढोलकी, डमरू, दिमडी, टाळ, चाळ, एकतारी, वेणू यासारखी वाद्ये असतात, तेव्हा त्यातील गेयता प्रखर होते. आणि गायनासोबतच नृत्यही सादर केले जाते. नृत्यामुळे आणि शारीरिक हालचाली व हावभावामुळे त्यातील नाट्यमयता अधिक प्रभावी वाटते. मात्र हे त्या सादर करणाऱ्या कलाकारावर अवलंबून असते.

नाथांचे एक प्रसिद्ध भारुड आहे 'दादला'

**' मोडकेसे घर, तुटकेसे छप्पर | देवाला देवघर नाही ||१||**
**मला दादला नको ग बाई मला नवरा नको ग बाई ||धृ ||**
**फाटकेच लुगडे, तुटकीच चोळी, शिवाया दोरा नाही, मला दादला नको गं बाई..||**
**जोंधळ्याची भाकर, अंबाडीची भाजी || वर तेलाची धार नाही, मला दादला नको ग बाई ||**
**मोडका पलंग तुटकेसी नवार || नरम बिछाना नाही, मला दादला नको ग बाई ||**
**सुरतींचे मोती गूळधाव सोने || राज्यात लेणे नाही ||**
**एका जनार्दनी समरस झाले, तो रस येथे नाही, मला दादला नको ग बाई|| मला नवरा नको ग बाई ||**

प्रत्येक मराठी माणसाला नाथांचे हे भारुड तोंडपाठ आहे. आपल्या नश्वर शरीरासाठी 'मोडकेसें घर' हे प्रतिक यात वापरलेले आहे. आपण आपल्या आरोग्याची काळजी घेत नाही, शरीराची निगा राखत नाही, याचे कारण म्हणजे निरक्षरता, असे नाथ महाराज इथे सांगतात. इथे फक्त लिहिता वाचता आले म्हणून साक्षरता येत नसते असे म्हणायचे आहे. म्हणून जीवन मूल्यांची साक्षरता हवी असा 'तुटकेसे छप्पर' यातील मतितार्थ आहे. आणि आपल्या अशा मनात श्रद्धा आणि भक्तीला स्थान नसल्याने 'देवाला देवघर नाही' असे नाथ महाराज पुढे म्हणतात. यातील स्त्रीला आपल्यातील अविवेकाची जाणीव झालेली आहे. दादल्याचा म्हणजे अविवेकाचा त्याग करून तिला विवेक आत्मसात करायचा आहे. या भारुडातील स्त्रीला समाजातील इतर नात्यात रस वाटत नाही. म्हणून ती स्वतःतील दुर्गुण कमी करून परमार्थ साधण्याचा विचार करते असे हे भारुड आहे. यात ती स्त्री नऊवार साडी नेसून, सौभाग्याचं लेणं कपाळाला मोठा कुंकू लावून दाग दागिने घालून रंगमंचावर येते. सुहासिनीच सोंग तिनं घेतलेला आहे. आणि त्या रूपात ती संसाराची (आपल्यातील विकाराची) व्यथा मांडते. तेव्हा त्यातून नाट्य निर्माण होतं. सोबत साथ संगत करणारी मंडळी ही तिला गायनातून साथ देत असते. नाथ महाराजांचे आणखी एक प्रसिद्ध भारुड पहा.....

**' अग ग ग गं विंचू चावला ||**
**देवा रे देवा, विंचू चावला ||**
**काम, क्रोध, विंचू चावला ||**
**तम घाम अंगासी आला ||**
**त्याने माझा प्राण चालीला ||**

नाथ महाराजांचे हे भारुड देखील महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. नाथ महाराजांचे हे भारुड देखील 'विंचू' या रुपकासह नाट्यमय पद्धतीने मंचावर सादर करता येते. काम, क्रोध, लोभ, मच्छर, द्वेष, इत्यादी विकार जेव्हापासून अंगात वाढले, तेव्हापासून विंचू चावल्याप्रमाणे सर्वांगात वेदना होत आहेत आणि या वेदनांनी 'तम' रुपी घाम आला आहे, असे इथे नाथ महाराजांना सुचवायचे आहे. रंगमंचावर जेव्हा हे पात्र उभे राहते, तेव्हा अनेक प्रकारे नृत्य व नाट्य त्यात पाहायला मिळते. ही बाई अंगात यातना होत आहे असे जेव्हा सांगते तेव्हा ती रंगमंचावर अग ग ग करत थयाथया नाचू लागते. शाहीर जेव्हा तिला याचे कारण विचारतो, तेव्हा ती या नृत्यातूनच शाहिराला उत्तर देते यावेळी तिचे केस मोकळे आहेत आणि ती सैरभैर झालेली आहे. त्यावेळी आपले दुःख व्यक्त करताना तिची मानसिकता ती आपल्या अभिनयातून व्यक्त करते. तिच्या संवादातून हास्य निर्माण होते. संगीत व नृत्यामुळे ते संवाद व तिचा अभिनय अधिकच प्रभावी वाटतो. एकूणच नाथ महाराजांच्या या भारुडातील नाट्यमयता अधिक प्रभावी वाटते, असे म्हणता येईल.

याशिवाय नाथ महाराजांची अनेक भारुडे ही नाट्यमयतेच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत. कारण नाथ महाराजांनी आपली भारुडे सर्वसामान्यांच्या जीवनाशी जोडलेली आहेत. त्यात हास्य-विनोद, संवाद, आणि नाट्यत्मकता अधिक पाहायला मिळते. 'टवाळा आवडे विनोद' अशी विनोदाची उपेक्षा काही जुन्या कवींनी केलेली असली, तरी नाथ महाराजांनी विनोद हा फक्त टवाळांनाच नव्हे तर सर्वसामान्यांनाही आवडतो, असे प्रत्युत्तर आपल्या सोंगी भारुडातून दिलेले आहे. त्यांच्या भारुडात विविध सोंगे घेतल्यामुळे त्यातील चित्रण प्रेक्षकांच्या डोळ्यापुढे हुबेहूब उभे राहते आणि मग नाथ महाराज अध्यात्मिक विचार हळूच त्यांना सांगतात, त्यामुळे त्यांचे ते किचकट आणि अवघड वाटणारे अध्यात्मिक विचार देखील सोपे आणि अधिक प्रभावी वाटतात. त्यांची भारुडे गाताना त्यात प्रसंगानुरूप बतावणीही सादर करता येते. त्यामुळे त्यांची भारुडे सर्वसामान्यांना सहज समजतात, सहज उमजतात. नृत्य, नाट्याद्वारे सोपी शिकवण देणारी नाथांची भारुडे आहेत, असे इथे म्हणता येईल.

**गृहीतके**

१) संत एकनाथ महाराजांची भारुडे ही नृत्य, नाट्य आणि संगीत यांच्या मिलाफाने सजलेली असल्याने आणि त्याला हास्य विनोदाची झालर असल्याने त्यातील नाट्यमयता अधिक प्रभावी वाटते.

२) संत एकनाथ महाराजांची भारुडे रंगमंचावर सादर करताना त्यातील पात्र, संवाद, अभिनय, आणि संगीत यावर अधिक भर दिलेला असतो.

३) संत एकनाथ महाराजांची भारुडे लोकभाषेतून असल्याने सर्वसामान्य लोक सहज त्याच्याशी समरस होऊन अध्यात्मासारखा अवघड विषय ही लोकांना सहज समजतो.

४) संत एकनाथ महाराजांनी आपल्या भारुडातून अध्यात्माला सामान्य माणसाच्या दैनंदिनिशी जोडल्याने प्रत्येक वेळी त्यात वेगवेगळी बतावणी करून, नाट्यमयता आणता येते.

**समारोप**

आपले धार्मिक ग्रंथ म्हणजेच वेद, उपनिषद, भगवद्गीता, रामायण-महाभारता सारखी महाकाव्ये म्हणजेच ज्ञानाचा महासागर आहेत. त्यात ते सर्वसामान्यांना समजण्यासाठी अवघड आणि किचकट

आहेत. त्यामुळे आपल्या संतांनी ज्ञानरूपी या महासागरातून मंथन करून भारुडासारखे सहज उमजणारे काव्य रचले. त्यात नाथ महाराजांनी तर या काव्याला सामान्यांच्या दैनंदिन व्यवहाराशी जोडले, त्यामुळे अवघड वाटणारा विषय ही सोपा झाला आहे. त्यांच्या भारुडाचे विषय म्हणजे व्यंगात्मक, भूत-पिशाच्च, सण-समारंभ, उत्सव, खेळ, जोहार, जाती-व्यवसाय, नाती-गोती, संसारातील मर्यादा असे प्रबोधनपर विषय असल्याने त्यात वेळप्रसंगी अधिक नाट्यमयता आणता येऊ शकते. ही भारुडे प्रत्येक काळात लागू पडतात. त्यांच्या भारुडातील विषयाची मांडणी, नाट्यमय घडामोडी, आणि समाजाला सहज उमजेल अशी नर्म विनोदी हास्यरचना, कायमच समाजाचे प्रबोधन करत राहते व त्यातील नाट्यमयता दिवसेंदिवस वाढत जाते असे म्हणता येईल.

**संदर्भसूची**

१) डॉ. प्रभाकर मांडे - लोकरंगभूमी, कैलाश पब्लिकेशन्स औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, पृष्ठ क्रमांक १३४.

२) ऋता ठाकूर - लोकसाहित्य लोकसंस्कृती, मराठी विश्वकोश.

३) डॉ. प्रभाकर मांडे - लोकरंगभूमी, कैलाश पब्लिकेशन्स औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, पृष्ठ क्रमांक १३५.

४) तत्रैव, पृष्ठ क्रमांक १३५.

५) ऋता ठाकूर - लोकसाहित्य लोकसंस्कृती, मराठी विश्वकोश.

६) संत एकनाथ महाराजांच्या भारुडातील चिन्ह संकेत - सोशल मीडिया, १९ जानेवारी २०१९.

७) Athvnitil-gani. com / सोशल मीडिया.